# प्रकरण 15 वे

## कार्यपूर्ततेसाठी रुग्णालयाने ठरविलेल्या  प्रमाण पध्दती

1- बाहय रुग्ण विभागात दाखल झालेल्या  रुग्णांची संबंधीत वैद्यकीय अधिकारी त्वरीत तपासणी करतील.

2- अत्यवस्थ रुग्णांची त्यावेळी कार्यरत असलेले वैद्यकीय अधिकारी त्वरीत तपासणी करुन  योग्य ते उपचार करतील.

3- अंतविभागात असलेल्या रुग्णांची दररोज सकाळी 10 पूर्वी गरज असले तेव्हा तपासणी करतील.

4- बाहयरुग्ण विभागात दाखल झाल्यानंतर विकृतिशात्र तपासण्या त्या दिवशी किंवा दुस-या दिवशी सकाळी करण्यात येतील.

5- क्षकिरण व हृदय स्पंदन आलेख बाहयरुग्ण  विभागात दाखल झालेल्या अत्यवस्थ रुग्णांची क्ष-किरण व हृदय स्पंदन आलेख 1 तासांत करण्यात येतील व नियमित रुग्णांची दुस-या दिवशी सकाळी तपासणी केली जाईल.

6- सर्व अनुसूची औषधे दररोज रुग्णांसाठी उपलब्ध केली जातील . आतंर रुग्ण विभागातील रुग्णांना अनुसूची औषधे लवकरात लवकर उपलब्ध करण्यात येतील.

7- रुग्णालयाविषयीची कोणतीही तक्रार रुग्णालयातील वरीष्ठ अधिका-यांकडून ताबडतोब निकालात काढण्यात येईल.

8- सर्व रुग्णांची परिचारीका योग्य ती शुश्रुषा करतील.

9- रुग्णालयातील सर्व कर्मचारीवृंद दयाळू व क्षमाशील असेल.

10-गरीब व गरजू रुग्णांना गरीब धर्मादाय निधीतून मदत दिली जाते.

11-महानगरपालिकेने वेळोवेळी अनुसरलेल्या कार्यप्रणालीनुसार रुग्णालय चालविण्यात येते.